# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.९४९/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. किशोर बाबुराव आहेर, रा.मु.पो. जातगांव, ता. नांदगांव, जि. नाशिक | शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय येवला यांचे कार्यालय, येवला – कोपगांव रोड, येवला, ता.येवला, जि. नाशिक | उपविभागीय अधिकारी, येवला उपविभागीय येवला यांचे कार्यालय, येवला कोपरगाव – रोड, येवला, ता. येवला, जि. नाशिक |

**सुनावणी दिनांक – २३/०४/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १६/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती करण्यात आलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०६/१२/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०६/१२/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१५ ते दि. ३०/०७/२०२१ पर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती**

मा. उपविभागीय अधिकारी साहेब येवला, ता. येवला या कार्यालयातुन नांदगांव तालुक्यातील व येवला तालुक्यातील कोळी – महादेव व भामटा राजपुत (राजपुत-भामटा) या दोन समाजातील ज्या लोकांना सन २०१५ ते ३०/०७/२०२१ पर्यंत जातीचे दाखले दिले गेले आहे तो दाखला मिळणेसाठी त्या प्रकरणा सोबत जे काही पुरावे जोडले आहे त्या सर्व जातीचे दाखले वितरीत केलेल्या नस्तींची सन २०१५ ते दि.३०/०७/२०२१ पर्यंतच्या वितरीत केलेल्या जातींच्या व प्रत्येक प्रकरणांच्या छायांकित प्रती मला लवकरात लवकर मिळाव्या ही विनंती.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्ज जनमाहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, येवला उपविभाग, येवला यांनी दि.०४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार येवला/नांदगांव यांच्याकडे वर्ग करण्यात आला. असे अपीलार्थी यांना कळविण्यात आले.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०७/०१/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०७/०१/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, येवला उपविभागीय येवला यांचे कार्यालय, येवला, ता. येवला, जि. नाशिक यांनी दि.२१/०१/२०२२ आणि दि.०३/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले. तसेच अपीलार्थी दोन्ही सुनावणीस गैरहजर होते त्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले आहे.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा —**

विद्यमान जन माहिती अधिकारी — अपीलार्थी यांचा माहिती अर्ज दि.०४/०१/२०२२ च्या पत्रान्वये नायब तहसिलदार येवला/नांदगांव यांच्याकडे वर्ग करण्यात आला तसेच अपीलार्थी यांनी विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहितीची मागणी केली असल्याचे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष —**

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश पारित केल्याचे दिसून येते.

२) अपीलार्थी यांच्या माहिती अर्जात दिनांकासहीत कालावधी नमूद नाही त्यामूळे माहिती अर्ज मोघम ठरतो. तसेच अपीलार्थी सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांनी कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नाही.

३) अपीलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०६/१२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ मधील नियम ३(क) नुसार ही माहिती देय नाही.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक. ९४९/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९८ 07 JAN 2025

निर्गमित केले.
दिनांक 07 JAN 2025
सही